Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

## स्टार्स, प्रकल्प अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव
श्रीम. प्रिती प्रदीप देशमुख
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. रश्मी जोशी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश:***

***शिक्षणाचे प्रमुख उद्‌दिष्ट्य विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे असून त्यासाठी त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने देखील अनेक प्रकारचे ऊपक्रम प्राथमिक शाळांच्या विकासासाठी राबवलेले आहेत. प्राथमिक स्तर हा मजबूत झाल्यास भविष्यामध्ये आपोआपच उच्च शिक्षण स्तर देखील मजबूत होईल. या उद्‌देशापोटी महाराष्ट्र शासनाने विविध प्रकारचे प्रकल्प या ठिकाणी राबविलेले आहेत. यामध्ये इंग्रजीच्या उत्तम अध्ययन अध्यापनासाठी मुख्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवलेला होता. त्याचप्रमाणे मोहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर देखील या ठिकाणी करण्यात आलेला होता. त्याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने स्टार्स प्रकल्प याठिकाणी राज्यांसाठी राबवलेला आहे. राज्यांसाठी अध्यापन, शिक्षण आणि परिणाम बळकट करणे, असमानता दूर करणे; शैक्षणिक मानके उंचावणे यासर्व उिद्दष्टांनी स्टार्स प्रकल्प सुरु केला आहे***

***शाळांमधून स्टार्स प्रकल्प राबवित असताना विविध प्रकारचे उपक्रम प्राथमिक शाळांनी राबवणे अपेक्षित आहे. त्याठिकाणी उपक्रमांची यादी बघता वर्गकोपरे, वर्ग-सजावट, साहित्य निर्मिती, प्राथमिक साहित्यपेटी यांचा समावेश होतो. या प्रकल्पाला केंद्रसरकारने दि. 24 जून 2020 रोजी परवानगी दिली. [NEP 2020] नुसार समान उद्दिष्टांवर कार्य करणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पाअंतर्गत आत्मनिर्भर भारत या अभियानाचा एक भाग म्हणून, PM-ई-विदया, पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र मिशन तसेच अर्ली चाईल्ड केअर, अध्यापन या उपक्रमांवर लक्षकेंद्रित केले जाईल. शास्त्रीय फ्रेमवर्क या उपक्रमावर लक्ष्य केंद्रित केले जाईल. हा प्रकल्प प्रामुख्याने covid-19 या महामारीमुळे विदयार्थ्यांना सोसावा लागणारा तोटा लक्षात घेऊन भारत सरकारने सुरु केला आहे आणि मंजूर केला आहे.***

*Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्त्वाचे शब्द -** स्टार्स प्रकल्प, प्राथमिक साहित्य पेटी

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

① **स्टार्स प्रकल्प**

STARS Strengthening Teaching-Learning and Results for states म्हणजेच, राज्यांसाठी अध्यापन - शिक्षण आणि परिणाम मजबूत करणे. स्टार्स प्रकल्पाचा फायदा 6-17 वयोगटातील विद्यार्थ्यांना होईल आणि सुमारे 25 कोटी विद्यार्थी, 15 दशलक्ष शाळा आणि अंदाजे 1 कोटी शिक्षकांना याचा फायदा होईल. या प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आधुनिक शिक्षण पद्धतींचा अवलंब केला पाहिजे यासाठी शिक्षक आणि प्राध्यापकांना योग्य प्रशिक्षण दिले जाईल.

हा प्रकल्प शाश्वत विकास उद्दिष्ट्ये [SDG] देखील लक्ष्य करेल.

स्टार्स प्रकल्पांतर्गत काठी राज्यांच्या शैक्षणिक व्यवस्थेचे व्यवस्थापन एका विशिष्ट संस्थेकडे असल्याने, योग्य शिक्षण आणि शाळांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये संतुलन राखणे सोयीचे होईल. हा कार्यक्रम भारताच्या मानवी भांडवलाची मागणी वाढवण्यावर लक्ष केंद्रित करेल

② **प्राथमिक शैक्षणिक साहित्य पेटी :**

प्राथमिक शिक्षणामध्ये शैक्षणिक साहित्य पेटी म्हणजे विदयार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची एक पेटी. या पेटी विविध विषयासाठी आवश्यक असलेले साहित्य, जसे की लेखन साहित्य, गणित साहित्य, भाषा साहित्य आणि इतर शैक्षणिक साहित्य समाविष्ट असते.

**या पेटीतील साहित्याचे उदाहरण :**

① **भाषा साहित्य :** मुळाक्षरे कार्ड , गिरवण्याची पाटी, मुळाक्षरांच्या प्रतिकृती, स्वरचिन्ह चित्रगप्पा स्वरचिन्हे, चित्रवाचन, चित्रवर्णन, इत्यादी

② **गणित साहित्य :** 1 ते 100 संख्याकार्ड, मणीमाळ, दशक दांडे, सुटमणी, दशकबांगडी, विविध आकृत्या, शैक्षणिक साहित्यपेटीमुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि शारीरिक विकासास मदत होते. विद्यार्थ्यांना शिकण्यात गोडी निर्माण होते. कृतीयुक्त शिक्षणामुळे आनंददायी शिक्षण होते.

**स्टार्स प्रकल्प अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास संशोधनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी →**

संशोधक म्हणून संशोधक शिक्षक म्हणून अध्यापन करत असताना त्याला राज्य शासनाचे भारत शासनाचे उपक्रम याठिकाणी राबवावे लागतात. असे असताना प्राथमिक शाळांमधून अशा उपक्रमाची तर मांदीयाळी निर्माण झालेली दिसून येते. आणि यासगळयाच पार्श्वभूमीवर एक वेगळा आणि आगळा उपक्रम म्हणजे स्टार्स प्रकल्प हा होय.

या उपक्रमाद्वारे संशोधकाला शाळेमध्ये प्राथमिक साहित्यपेटी उपलब्ध झालेली आहे. या साहित्यपेटीचा वापर करून विद्याथ्यांना अध्ययन सक्रिय करणे करणे आणि गुंतवून ठेवणे ही दोन उद्‌दिष्ट्ये आणि त्याचा वापर करणे अपेक्षित आहे. परंतु ही साहित्य पेटी जरी असली तरी, तिचा वापर कसा करावा ? वापर करताना कोणती काळजी घ्यावी? त्याचप्रमाणे विदयार्थ्यांकडून हे उपक्रम यातील साहित्याचा वापर कसा करता येईल? या सर्वांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

या पेटीतील साहित्य हाताळताना इतरही शिक्षकांना जाणवणाऱ्या ज्या काही समस्या आहेत त्याचा अभ्यास करण्याचा दृष्टीने पण संशोधकाला या संशोधनाची गरज भासली.

**संशोधन समस्येची सद्यस्थिती:**

**स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी वापर फायदे**

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटीचा वापर केल्याने विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी शिक्षण मिळते, कारण साहित्य पेटी विद्यार्थ्यांना विविध प्रकारे शिकण्यासाठी मदत करते.

**स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटीचा वापर कसा करावा:**

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटीचा योग्य वापर केल्यास विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे शिकता येते, पण काही शिक्षक साहित्य पेटीचा पुरेसा वापर करत नाहीत.

विद्यार्थ्यांकडून साहित्य पेटीचा वापर कसा केला जातो:

विद्यार्थ्यांकडून साहित्य पेटीचा वापर कसा केला जातो, हे तपासणे आवश्यक आहे.

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी तयार करताना येणाऱ्या अडचणी:

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी तयार करताना काही अडचणी येतात, जसे की योग्य साहित्य निवडणे आणि ते कसे वापरावे हे ठरवणे.

**साहित्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये बदल:**

साहित्य पेटी वापरल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक बदल होताना दिसतात, जसे की त्यांची शिकण्याची आवड वाढणे.

**संशोधनाचे उद्देश:**

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटीचा वापर कसा होतो हे तपासणे.

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी वापरल्याने विद्यार्थ्यांमध्ये होणारे बदल तपासणे.

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी तयार करताना येणाऱ्या अडचणी ओळखणे.

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटीचा वापर अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना करणे.

**निष्कर्ष:**

स्टार्स प्रकल्प अंतर्गत साहित्य पेटी (learning kit) वापरताना येणाऱ्या अडचणींवर संशोधन करणे आवश्यक आहे, जेणेकरून स्टार्स प्रकल्प अंतर्गत अधिक प्रभावी साहित्य पेटी चा वापर करता येईल. तसेच, विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे शिकता येईल.

**समारोप :**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन विषय समस्येची पार्श्वभूमी, ऐतिहासिक आढावा सद्यस्थिती याबाबत माहिती विवेचन करण्यात आले आहे

**संदर्भसूची -**

1. बापट भा गो. (1975) शैक्षणिक संशोधन, पुणेः नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि.रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धत पुणे: नूतन प्रकाशन
3. गूगल
4. मुळे रा.श. आणि उमाठ, वि.तू. (1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपुर: महाराष्ट्र विद्यापी ग्रंथ निर्मिती मंडळ.